नियमित दिवाणी दावा क्र. ६८०/२०१९
सीएनआरक्र.एमएचबीआय१०००२६५२२०१९
रमेश वि.. संदिपान

**नि.दि.दावा क्र. ६८०/२०१९ मध्ये निशानी क्र.२१ वर आदेश**

वादीतर्फे दाखल करण्यात आलेला अर्ज वाचला. त्यावर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचेतर्फे दाखल म्हणण्याचे अवलोकन केले. उभय पक्षाच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

२. उपरोक्त वादी /अर्जदाराचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ४ सखाराम सुखदेव घुले मयत असुन प्रतिवादी क्र. १ ते ३ त्याचे वारस आहेत. वाद मिळकत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या नावावर आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र. ४ सखाराम घुले याचे नाव दाव्यातून कमी करण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदविताना असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादी क्र. ४ कधी मयत झाला याचा उल्लेख केलेला नाही. तसेच त्याबाबत मृत्यू प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. प्रतिवादी क्र. ४ दावा दाखल करण्यापुर्वी मयत असल्याचे बेलीफ अहवालावरुन दिसून येते. त्यामुळे सदरचा अर्ज हा मोघम स्वरुपाचा आहे.

४. प्रतिवादी क्र. ४ मयत झाला असल्याची बाब वादग्रस्त नाही. नि.क्र. १२ वरील बेलीफ अहवालावरुन तो १० ते १२ वर्षांपुर्वी मयत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ चे नाव दाव्यातून कमी करणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे नोंदविण्यात आलेले आक्षेप हे मोघम स्वरुपाचे आहेत. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ सखाराम सुखदेव घुले हे मयत असल्याने त्यांचे नाव दाव्यातून वगळण्यास परवानगी देण्यात येते.

स्वा/-
( बी. एस. संकपाळ )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

दिनांक ११.११.२०२१

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | |
|---|---|
| Dictated on | : 11/11/2021 |
| Transcribed on | : 11/11/2021 |
| Checked & signed on | : 11/11/2021 |

Sd/-

(P.V. Bhosale),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.